क्र. १४९ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

१८ जून २०२३

## सामान्यकाळातील अकरावा रविवार

### प्रस्तावना

दिवंगत पोप जॉन पॉल दुसरे म्हणतात, ''युवक-युवती हा मोलाचा ठेवा आहे.'' युवक-युवतींनो, ''चिंतन करा व चिंतन करायला शिका.'' ख्रिस्तसभा युवकांकडे मोठ्या आशेने पाहते. भोगवाद, स्वार्थ, पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण, नैतिक मूल्यांची घसरण ह्यांचा पालक, समाज आणि युवक-युवती गांभीर्याने विचार करत नाहीत. आजच्या पहिल्या व दुसऱ्या वाचनाद्वारे परमेश्वराचे पाचारण समजून घेऊन त्याप्रमाणे आचरण करणाऱ्यांना परमेश्वर आपली निवडलेली प्रजा व पवित्र लोक होण्याचे अभिवचन देतो. आजच्या शुभवर्तमानात सांगितल्याप्रमाणे ''पीक फार आहे परंतु कामकरी थोडे आहेत.'' ह्यास्तव पीकाच्या धन्याने आपल्या कापणीस कामकरी पाठवावे म्हणून ह्या पवित्र मिस्साबलीत युवक-युवतींसाठी विशेष प्रार्थना करूया

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे सर्वसमर्थ परमेश्वरा, आमच्या आशादीपका व सामर्थ्या, तुझ्या कृपेशिवाय पुढे जाणे आम्हांला अशक्य आहे. ख्रिस्ताचे अनुकरण करण्यास व तुझ्या इच्छेप्रमाणे जीवन जगण्यास आम्हांला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात, सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**निर्गम या पुस्तकातून घेतलेले वाचन १९:२-६**

**''तुम्ही मला याजकराज्य, पवित्र राष्ट्र असे व्हाल.''**

इस्राएल लोक रफीदीम येथून कूच करीत सिनायच्या रानात आले आणि त्या रानात त्यांनी डेरे दिले; तेथे पर्वतासमोर इस्राएल लोकांनी तळ दिला. तेव्हा मोशेने देवाकडे वर गेला आणि परमेश्वराने त्याला पर्वतातून हाक मारुन सांगितले की, याकोबच्या घराण्याला हे सांग, आणि इस्राएल लोकांना हे जाहीर करा : मी मिसऱ्यांचे काय केले ते आणि तुम्हांला गरुडाच्या पंखांवर बसवून मी आपणाकडे कसे आणले आहे हे तुम्ही पाहिले आहे म्हणून आता तुम्ही खरोखर माझी वाणी ऐकाल आणि माझा करार पाळाल तर सर्व लोकांपेक्षा माझा खास निधी व्हाल, कारण सर्व पृथ्वी माझी आहे; तुम्ही मला याजकराज्य, पवित्र राष्ट्र असे व्हाल.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

९९: २,३,५

प्रतिसाद : **आम्ही त्याची प्रजा, त्याच्या कुरणातील कळप आहे.**

१. हर्षाने परमेश्वराची सेवा करा,
गीत गात त्याच्यापुढे या.

२. परमेश्वर हाच देव आहे हे जाणून घ्या.
त्यानेच आम्हांला उत्पन्न केले; आम्ही त्याचेच आहो, आम्ही त्याची प्रजा, त्याच्या कुरणातील
कळप आहो.

३. कारण परमेश्वर चांगला आहे, त्याची दया सनातन आहे. त्याची सत्यता पिढ्यानुपिढ्या टिकते.

### दुसरे वाचन

**पौलाचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन ५:६-११**

**''तर आता देवाबरोबर त्याच्या पुत्राच्या मृत्युद्वारे आपला समेट झाला असता, त्याच्या पुत्राच्या जीवनाने आपण तारले जाणार आहो.''**

आपण दुर्बळ असतानाच ख्रिस्त समयी अभक्तांसाठी मरण पावला. नीतिमान मनुष्यासाठी कोणी मरणारा विरळा, चांगल्या मनुष्यासाठी मरण्यास कदाचित कोणी धाडस करील. परंतु देव आपणावरच्या स्वत:च्या प्रीतीचे प्रमाण देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपणासाठी मरण पावला. तर आता त्याच्या रक्ताने नीतिमान ठरवण्यात आल्यामुळे आपण विशेष करून त्याच्याद्वारे देवाच्या क्रोधापासून तारले जाणार आहोत. कारण आपण शत्रू असता देवाबरोबर त्याच्या पुत्राच्या मृत्युद्वारे आपला समेट झाला, तर आता समेट झालेला असता त्याच्या जीवनाने आपण विशेष करुन तारले जाणार आहोत. इतकेच केवळ नाही, तर ज्याच्याद्वारे समेट ही देणगी आपणाला आता मिळाली आहे त्या आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्याद्वारे आपण देवाच्याठायी अभिमान बाळगतो.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान १७:१७**

**आलेलुया, आलेलुया!**

हे प्रभो, तुझे वचन हेच सत्य आहे.

तू आम्हांला सत्यात समर्पित कर.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन ९:३६-१०:८**

**''येशूने आपल्या बारा शिष्यांना आज्ञा करून पाठवले.''**

लोकसमुदायाला पाहून त्यांचा येशूला कळवळा आला. कारण मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखे, ते गांजलेले आणि पांगलेले होते. तेव्हा तो आपल्या शिष्यांना म्हणाला, ''पीक फार आहे खरे, पण कामकरी थोडे आहेत; ह्यास्तव पिकाच्या धन्याने आपल्या कापणीस कामकरी पाठवून द्यावेत म्हणून त्याची प्रार्थना करा.''

मग त्याने आपल्या बारा शिष्यांना जवळ बोलावून त्यांना अशुध्द आत्म्यांवर सत्ता देऊन ते काढून टाकण्याचा आणि सर्व विकार आणि सर्व दुखणी बरे करण्याचा अधिकार दिला. त्या बारा प्रेषितांची नावे अशी आहेत : पहिला पेत्र म्हटलेला शिमोन आणि त्याचा भाऊ अंद्रिया, जब्दीचा मुलगा याकोब आणि त्याचा भाऊ योहान, फिलिप आणि

बार्थोलोम्यू, थोमा आणि मत्तय जकातदार, अल्फीचा मुलगा याकोब आणि तद्दय, शिमोन कनानी आणि येशूला धरुन देणारा यहुदा इस्कार्योत.

ह्या बारा जणांस येशूने अशी आज्ञा करून पाठवले की, ''परराष्ट्रीयांकडे जाणाऱ्या वाटेने जाऊ नका आणि शोमरोन्यांच्या कोणत्याही नगरात प्रवेश करू नका. तर इस्राएलच्या घराण्यातील हरवलेल्या मेंढरांकडे जा. जात असताना अशी घोषणा करीत जा की, 'स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे.' आजाऱ्यांस बरे करा. मेलेल्यांस उठवा, कुष्ठरोग्यांस शुध्द करा, भुते काढा, तुम्हांला फुकट मिळाले फुकट द्या.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू :**

ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या, तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा आपण विश्वास बाळगू या.

प्रतिसादः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. ख्रिस्तसभेची धुरा वाहणारे पोप, सर्व महागुरू, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना समाजातील उपेक्षित जनतेपर्यंत श्रध्दाबांधणी कार्य करण्यासाठी प्रभूची कृपा व सामर्थ्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करूया

२. आपले राजकीय पुढारी व शासकीय नेत्यांनी तळागाळातील उपेक्षित जनतेपर्यंत जाऊन त्यांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील असावे म्हणून आपण प्रार्थना करूया.

३. 'पिक भरपूर आहे, कामकरी मात्र थोडे आहेत' हा शुभवर्तमानातील संदेश लक्षात घेऊन तरुण-तरुणींना ईश्वरी हाकेची ओळख होण्यासाठी पवित्र आत्म्याचे सामर्थ्य लाभावे म्हणून आपण प्रभूची कृपा मागू या.

४. ख्रिस्तसभेपासून दुरावलेल्या भाविकांनी प्रभूच्या कळपात परत यावे, एक मेंढपाळ, एक कळप म्हणून आपण श्रध्देमध्ये दृढ व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर प्रभूच्या कृपेचा वर्षाव व्हावा, जे आजारी आहेत, परगावात, परदेशात आहेत त्यांना चांगले आरोग्य लाभावे, ह्या हंगामात आपल्याला आवश्यक असलेला पाऊस पुरेशा प्रमाणात मिळावा म्हणून आपण प्रार्थना करूया

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू :**

हे पित्या, तुझ्या लोकांच्या या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो परमेश्वरा, भाकर व द्राक्षरसाद्वारे तू आम्हांला शारीरिक व आत्मिक अन्न देतोस. या बलिदानाच्या कृपाशक्तीने आम्हांला शारीरिक व आत्मिक आरोग्य लाभावे व नवजीवनाचे वरदान मिळावे म्हणून साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, या ख्रिस्तप्रसादाद्वारे ख्रिस्तसभेमध्ये ऐक्याचे व शांतीचे साम्राज्य प्रस्थापित कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

'बारा प्रेषित' हे शब्द उच्चारले की आपल्या डोळ्यांसमोर 'अखेरचे भोजन' किंवा 'पायधुणी' ह्यांचे चित्र येते. मात्र प्रेषितांचे जीवन केवळ त्या दोन घटनांपुरता मर्यादित नाही. प्रेषित आणि शिष्य ह्याच्यामध्ये फरक आहे. शिष्य म्हणजे अनुकरण करणे, पावलांवर पाऊल ठेवणारा. प्रेषित म्हणजे विशिष्ट कामगिरीवर पाठविलेला. आजची वाचने प्रेषितांविषयी तीन चिंतने आपल्यापुढे मांडतात :

**१) परमेश्वराला असलेली आपल्या लोकांची काळजी :** परमेश्वराला आपल्या निवडलेल्या लोकांची काळजी आहे. पहिल्या वाचनात तो आपल्या ह्या लोकांना गरुडाच्या पंखावर घेऊन पवित्र भूमीकडे निघालेला आहे तर शुभवर्तमानात मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखे गांजलेले व पांगलेले लोक पाहून येशूला त्यांचा कळवळा येतो. त्यांची काळजी घेण्यासाठी तो बारा प्रेषितांची निवड करतो.

**२) प्रेषित पदासाठी आवश्यक असलेली पात्रता :** येशूने जे बारा प्रेषित निवडले ते खरे पाहता कोणत्याही बाबतीत आदर्श नव्हते. त्यांच्यामध्ये दोष होते. पेत्र चंचल होता, मत्तय जकातदार (पापी) होता, ज्युदास लोभी होता, शिमोन कनानी हिंसाचारी गटातला होता, याकोब व योहान भांडखोर व मानासाठी हपापलेले होते. नथनेलच्या मनात पूर्वग्रह होते. येशूने त्यांचा भूतकाळ किंवा वर्तमानकाळ पाहिला नाही. ते काय वा कोण बनू शकतात, आपण त्यांना कसे घडवू शकतो याकडे त्याने लक्ष दिले.

**३) प्रेषितीय कार्यासाठी आवश्यक असलेली तळमळ :** आपल्या प्रेषितांनी पाचारणासाठी प्रार्थना करावी, प्रेषितीय कार्यावर असताना एक विशिष्ट साधी, सेवाभावी जीवनशैली अंगिकारावी, प्रभूची विचारसरणी आत्मसात करून तिची घोषणा करावी, आपल्या कार्यात झोकून द्यावे म्हणून येशू त्यांना पध्दतशीररित्या मार्गदर्शन करतो. त्यासाठी आजच्या दुसऱ्या वाचनात संत पौल येशू ख्रिस्ताच्या त्यागाचे व बलिदानाचे उदाहरण देतो. प्रेषितांनी पाप्यांसाठी आपले जीवन वेचावे, त्यांच्या परिवर्तनासाठी तळमळीने कार्य करावे असा संदेश त्यातून तो देतो.

**आत्मपरीक्षण :** बारा प्रेषितांमध्ये मला व्यक्तिशः कोणता शिष्य आवडतो? त्याचे गुण व दुर्गुण मला कोणता संदेश देतात? मला कोणत्या प्रेषितकार्यावर पाठविण्यात आलेले आहे? ते मी तळमळीने करतो का?

●●●

| जून २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | तिसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम १९ | सं रोमाल्ड (हि/पां) | : २ करिंथ.६:१-१०/मत्तय ५:३८-४२ |
| मंगळ २० | सं सिल्वेरियन (हि) | : २ करिंथ.८:१-९/मत्तय ५:४३-४८ |
| बुध २१ | सं अलॉयशिअस घोन्सागा (पां) | : २ करिंथ.९:६-११/मत्तय ६:१-६, १६-१८ |
| गुरु.२२ | सं जॉन फिशर (हि/तां) | : २ करिंथ.११:१-११/मत्तय ६:७-१५ |
| शुक्र २३ | सं जोसेफ कफासो (हि) | : २ करिंथ.११:१८,२१-३०/मत्तय ६:१९-२३ |
| शनि २४ | सं योहान बाप्तिस्तचा जन्मदिन (पां) | : यशया ४९:१-६/प्रे.कृ.१३:२२-२६/लूक १:५७-६६,८० |